# कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

जा.क्र.कडोंमपा/साप्र.मुका./११४
महानगरपालिका कार्यालय, कल्याण.
दिनांक : २३/४/२०२०

प्रति,
सहाय्यक जनसंपर्क अधिकारी,
कल्याण डोंबिवली महानगरपालिका,
कल्याण.

विषय :– जाहिरात वर्तमानपत्रात प्रसिध्द करणेबाबत
वैद्यकीय अधिकारी आणि इतर पॅरामेडीकल पदे

राज्यातील कोरोना विषाणूचा (COVID-19) प्रादुर्भाव रोखण्याच्या पार्श्वभूमीवर कल्याण डोंबिवली महापालिकेच्या रुग्णालयीन सेवेसाठी वाढीव मनुष्यबळ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने वैद्यकीय अधिकारी आणि इतर पॅरामेडीकल पदांवर निव्वळ तात्पुरत्या/अस्थायी स्वरुपात कंत्राटी पध्दतीने साथरोग कालावधीसाठी नेमणूक करणेकामी दि.२९/४/२०२० रोजी सांय.६.०० वाजेपर्यंत पात्र उमेदवारांकडून kdmcgad@gmail.com या मेल आयडीवर ऑनलाईन अर्ज मागविण्यासंदर्भातील जाहिरात सोबत जोडली आहे. सदरहू जाहिरात स्थानिकरित्या सर्वाधिक खप असलेल्या दोन राज्यस्तरीय वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात येवून, त्याबाबतचा अहवाल सादर करावा.

( विजय पगार )
उप आयुक्त (सा.प्र.)
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

प्रत :–
१) उप आयुक्त (ई–गव्हर्नन्स), क.डों.म.पा., कल्याण.
–/ सोबत जोडलेली जाहिरात महानगरपालिकेच्या वेबसाईटवर तात्काळ प्रसिध्द करुन पुर्तता अहवाल सादर करावा.

२) वैद्यकीय आरोग्य अधिकारी (प्रभारी), क.डों.म.पा., कल्याण.
–/ सोबत जोडलेल्या जाहिरातीस आपल्या स्तरावर जास्तीत जास्त प्रसिध्दी देण्यात यावी. तसेच जाहिरातीस अनुसरुन जास्तीत जास्त पात्र उमेदवारांना मुदतीत अर्ज करणेकामी आपल्या स्तरावर प्रोत्साहीत करावे.

३) सहा.मुख्य सुरक्षा अधिकारी (प्रभारी), क.डों.म.पा., कल्याण.
–/ सोबत जोडलेली जाहिरात महानगरपालिकेच्या नोटीस बोर्डावर तात्काळ प्रसिध्द करुन पुर्तता अहवाल सादर करावा.

Scanned with CamScanner

# कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

—: जाहिरात :—

राज्यातील कोरोना विषाणूचा (COVID-19) प्रादुर्भाव रोखण्याच्या पार्श्वभूमीवर कल्याण डोंबिवली महापालिकेच्या रुग्णालयीन सेवेसाठी वाढीव मनुष्यबळ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे पदांवर निव्वळ तात्पुरत्या/अस्थायी स्वरुपात कंत्राटी पध्दतीने साथरोग कालावधीसाठी नेमणूक करणेकामी **दि.२९/४/२०२० रोजी सांय.६.०० वाजेपर्यंत** पात्र उमेदवारांकडून **kdmcgad@gmail.com** या मेल आयडीवर ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अक्र | पदाचे नाव | पदसंख्या | शैक्षणिक अर्हता व अनुभव | दरमहा एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी (Medical Officer) | ४३ | M.B.B.S. | रु.५५०००/— |
| २ | आयुष वैद्यकीय अधिकारी (Ayush Medical Officer) | ६५ | B.A.M.S. / B.H.M.S./ B.U.M.S. | रु.३००००/— |
| ३ | हॉस्पीटल मॅनेजर (Hospital Manager) | ५ | Any Medical Graduate with one year experience of Hospital Administration. | रु.३५०००/— |
| ४ | स्टाफ नर्स (Staff Nurse)/ सहा.परिचारीका प्रसविका (A.N.M.) | ३१२ | G.N.M. / B.Sc. Nursing. (स्टाफ नर्सच्या एकूण जागांपैकी आवश्यक त्या संख्येइतके G.N.M. /B.Sc. Nursing पात्रता धारक उमेदवार न मिळाल्यास A.N.M. पात्रता धारकांमधून नियुक्ती केली जाईल. मात्र ही पदसंख्या २१६ पेक्षा जास्त असणार नाही. | स्टाफ नर्स—रु.१७०००/—<br>ए.एन.एम.—रु.१५०००/— |
| ५ | एक्सरे टेक्निशियन (X-Ray Technician) | ५ | Diploma in X-Ray Technician. | रु.१७०००/— |
| ६ | ईसीजी. टेक्निशियन (ECG Technician) | ७ | Diploma in ECG. Technician and experience of ECG Technician at least one year. | रु.१७०००/— |
| ७ | लॅब टेक्निशियन (Lab Technician) | ३ | B.Sc. DMLT. | रु.१७०००/— |
| ८ | फार्मासिस्ट (Pharmacist) | ११ | B.Pharm. / D.Pharm. | रु.१७०००/— |
| ९ | वॉर्डबॉय (Ward Boy) | ९५ | 10th Pass. with 2 years experience as a Ward Boy in a Hospital. | रोजंदारी (रु.४००/— प्रतिदिन) |

**टिप :— वरील पदाकरितां सेवानिवृत्त कर्मचारी असल्यास त्यांना प्राधान्य देण्यात येईल.**

**आरक्षण :—**

१) वैद्यकीय अधिकारी (४३ पदे) :— अनु.जाती—६, अनु.जमाती—३, विजा.(अ)—१, भज.(ब)—१, भज.(क)—२, भज.(ड)—१, विमाप्र.—१, इमाव.—८, एसईबीसी.—६, ईडब्ल्यूएस.—४, खुला—१०

२) आयुष वैद्य.अधिकारी (६५ पदे) :— अनु.जाती—८, अनु.जमाती—६, विजा.(अ)—२, भज.(ब)—२, भज.(क)—२, भज.(ड)—१, विमाप्र.—१, इमाव.—१२, एसईबीसी.—८, ईडब्ल्यूएस.—७, खुला—१६

३) हॉस्पीटल मॅनेजर (५ पदे) :— अनु.जाती—१, अनु.जमाती—१, खुला—३

४) स्टाफ नर्स (३१२ पदे) :— अनु.जाती—४१, अनु.जमाती—२२, विजा.(अ)—९, भज.(ब)—८, भज.(क)—११, भज.(ड)—६, विमाप्र.—६, इमाव.—५९, एसईबीसी.—४१, ईडब्ल्यूएस.—३१, खुला—७८

५) एक्स—रे टेक्निशियन (५ पदे) :— अनु.जाती—१, अनु.जमाती—१, खुला—३

६) ईसीजी. टेक्निशियन (७ पदे) :— अनु.जाती—१, अनु.जमाती—१, विजा.(अ)—१, खुला—४

७) लॅब टेक्निशियन (३ पदे) :— अनु.जाती—१, खुला—२

Scanned with CamScanner

८) फार्मासिस्ट (११ पदे) :– अनु.जाती–१, अनु.जमाती–१, विजा.(अ)–१, इमाव.–२, एसईबीसी.–१, ईडब्ल्यूएस.–१, खुला–४

९) वॉर्डबॉय (९५ पदे) :– अनु.जाती–१२, अनु.जमाती–७, विजा.(अ)–३, भज.(ब)–२, भज.(क)–३, भज.(ड)–२, विमाप्र.–२, इमाव.–१८, एसईबीसी.–१२, ईडब्ल्यूएस.–१०, खुला–२४.

**सर्वसाधारण अटी व शर्ती** :–

(१) कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्राकरितां सक्षम, काम करण्यास तयार आणि मधुमेह/उच्च रक्तदाब/ हृदयविकार इ. नसणाऱ्या सेवानिवृत्त कर्मचारी/अधिकारी/बॉड संपलेले डॉक्टर व नर्सेस यांना सदर पदभरती करितां प्राधान्य देण्यात येईल. सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांनी अर्जात सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचे संपूर्ण नांव, संपूर्ण पत्ता, मोबाईल क्रमांक, ई.मेल आयडी., जन्मदिनांक, शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाल्याचा पुरावा, वरील नमूद आजार नसल्याबाबत स्पष्ट उल्लेख करण्यात यावा. तसेच बॉड संपलेले डॉक्टर व नर्सेस यांनी अर्जात यापुर्वी केलेल्या सेवेचा संपूर्ण तपशिल नमूद करावा. सदर कर्मचारी अनुभवी असल्यामुळे त्यांची यादी तयार करुन त्यांच्या आरोग्य विषयक सेवा लगेचच घेता येईल. या कर्मचाऱ्यांनी कोऱ्या कागदावर अर्ज करुन अ.क्र.२ मध्ये नमूद मेल आयडीवर दिलेल्या मुदतीत सादर करावेत.

(२) नव्याने अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी ए–४ साईज कागदावर संगणकीकृत किंवा टंकलिखित केलेल्या सोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील अर्जातच परिपुर्ण माहिती भरुन अर्ज व संपुर्ण आवश्यक दस्ताऐवज स्कॅन (Scan) करुन PDF स्वरुपात **दि.२९/४/२०२०** रोजी **सायं.६.००** वाजेपर्यंत "आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण" यांच्या नावाने kdmcgad@gmail.com या मेल आयडीवर सोबत दिलेला अर्ज, इतर शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे एकाच PDF फाईलमध्ये सादर करावेत. उमेदवारांनी ई–मेलच्या विषयामध्ये "Application for the post ............................." असे स्पष्ट नमूद करावे. विहित मुदतीनंतर ई–मेलव्द्वारे प्राप्त झालेले अर्ज आणि अपुर्ण माहितीचे अर्जाचा विचार केला जाणार नाही.

(३) उमेदवारांचे अर्ज फक्त ई–मेल व्द्वारे स्वीकारण्यात येतील. अर्ज पोष्ट, कुरीयर अथवा प्रत्यक्षात (By Hand) स्वीकारण्यात येणार नाहीत.

(४) सर्व उमेदवारांनी सोबत जोडलेल्या अर्जाच्या नमुन्यात ( www.kdmc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध अर्जाचा नमुना ) अर्ज करणे बंधनकारक राहील.

(५) अर्जासोबत अ) वयाचा पुरावा, ब) मागासवर्गीय असल्यास जात प्रमाणपत्र, क) पदवी/पदवीका प्रमाणपत्र, ड) शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका, इ) संबंधित पदांकरीता तत्सम कौन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील. ई) शासकीय/निमशासकीय संस्थांमध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र एवढीच कागदपत्रे सादर करावीत.

(६) उमेदवारांची निवड झाल्यास त्यास कोविड–१९ साठी नेमणूक देण्यात येणार असून त्यांची नेमणूक ही कोविड–१९ साथ कालावधीपुरतीच राहणार असून, सदर साथ कमी झाल्यास किंवा रुग्णालयातील कोविड–१९ उपचार कक्ष बंद झाल्यास सदरील नेमणूक आपोआप संपुष्टात येईल. त्यासाठी किमान १ महिन्याची नोंटीस दिली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

(७) पदासमोर नमूद मानधन हे एकत्रित मानधन असून त्याव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाहीत.

(८) ई–मेल व्द्वारे प्राप्त झालेल्या अर्जावरुन व उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेवरुन मेरीट लिस्ट तयार करण्यात येईल. मेरीट लिस्ट तयार करताना Qualifying Exam. मध्ये मिळालेले शेवटच्या वर्षाच्या गुणांनुसार जास्तीत जास्त ८० गुण देण्यात येतील.

अनुभवामध्ये २ वर्षापेक्षा कमी अनुभव असल्यास ० गुण, २ वर्ष अनुभव असल्यास ३ गुण आणि पुढे प्रत्येक वर्षासाठी १ गुण याप्रमाणे जास्तीत जास्त १० गुण असतील.

तसेच उच्च/अतिरिक्त शैक्षणिक पात्रता उदा.पदव्युत्तर पदविका असल्यास अतिरिक्त २ गुण, पदवी असल्यास अतिरिक्त ३ गुण याप्रमाणे जास्तीत जास्त १० पैकी गुण देय राहतील

वरीलप्रमाणे सर्व बाबींचे गुण एकत्र करुन मेरीट लिस्ट तयार करण्यात येवून संबंधित पात्र उमेदवारास नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येईल.

Scanned with CamScanner

(९) मेरीट लिस्ट तयार झाल्यानंतर ती www.kdmc.gov.in या Website वर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच त्याचदिवशी आक्षेप मागविण्यात येईल. दुसऱ्या दिवशी आक्षेपाचा विचार करण्यात येवून Final Merit स्पेज तयार करण्यात येईल.

(१०) कोरोना विषाणू (कोविड—१९) प्रादुर्भाव लक्षात घेता उद्रेक सदृश्य परिस्थिती हाताळण्यासाठी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने सुरु केलेल्या रुग्णालयामध्ये/संस्थांमध्ये सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांची प्राधान्यक्रमाने नियुक्ती करण्यात येईल.

(११) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारिरीक व मानसिकदृष्टया सक्षम असावा. तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

(१२) आरक्षणानुसार उमेदवार उपलब्ध न झाल्यास, आरक्षित पदांवर खुला प्रवर्गातील उमेदवारांचा विचार करण्यात येईल.

(१३) सदर रिक्त पदांची संख्या कमी—जास्त होऊ शकते याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी. सदर संख्यांमध्ये कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांनी राखून ठेवले आहेत.

(१४) पुनर्नियुक्तीबाबत, महानगरपालिका सेवेत सामावून घेणेबाबत किंवा न्यायालय, शासन इत्यादीमार्फत सेवा संरक्षणाबाबत उमेदवारांना कुठलाही दावा करता येणार नाही.

(१५) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलून मिळण्याची मागणी करता येणार नाही. नियुक्ती दिलेल्या उमेदवारांना त्यांना दिलेल्या कार्यक्षेत्रात मुख्यालयी राहून सेवा देणे बंधनकारक राहील.

(१६) मुलाखत होणार नसल्याने, तसेच अर्ज ई—मेल व्दारेच घेण्यात येणार असल्याने कोणत्याही उमेदवारांनी महानगरपलिका कार्यालयात प्रत्यक्ष भेट देवू नये.

(१७) अर्जदारांनी आपल्या अर्जावर त्यांचा सध्या सुरु असलेला मोबाईल नंबर, ई—मेल आयडी. अचूक नोंदवावा. तसेच ते भरती प्रक्रीया पुर्ण होईपर्यंत सुस्थितीत राहील, याची त्यांनी दक्षता घ्यावी.

(१८) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दि.२५ एप्रिल, २०१६ चे शासन निर्णयास अनुसरुन अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकास उमेदवाराचे किमान वय १८ वर्षे आणि कमाल वय खुला प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागासवर्गीय करितां ४३ वर्षे राहील.

सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकारी यांचे वयोमर्यादा ७० वर्षापेक्षा कमी असावी. तसेच इतर पदांच्या सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांची सेवाप्रवेश व सेवासमाप्तीची वयोमर्यादा ६५ वर्षे इतकी असून वय ६० किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या उमेदवारांनी प्रमुख शल्यचिकित्सक यांचेकडून प्राप्त केलेले शारिरीकदृष्टया सक्षम असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

(१९) भरती प्रक्रियेदरम्यान उमेदवाराने चुकीची माहिती सादर केल्याचे, कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे, दबाव तंत्राचा वापर किंवा अनूचीत मार्गाचा अवलंब केल्याचे आढळून आल्यास कोणत्याही टप्प्यावर त्याची उमेदवारी / नियुक्ती कोणतीही पुर्वसूचना न देता रद्द करण्यात येईल.

( डॉ.विजय सूर्यवंशी ) भा.प्र.से.
आयुक्त,
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

Scanned with CamScanner